# प्रधान मुख्य वनसंरक्षक महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय

"वन भवन"रामगिरी रोड,सिव्हील लाईन्स, नागपूर
दूरध्वनी क्र. (०७१२).२५५६९१२,२५४९५६३,फॅक्स २५५३०१३, ई -मेल :pccfwl_ngp@sancharnet.in

**विषय :** अभयारण्यातील व अभयारण्या लगत गुरांना प्रतिबंधात्मक लस टोचणे बाबत.
क्रमांक : कक्ष-२३(३)/प्र.क्र./३६०५/०६-०७
नागपूर-४४०००१ दिनांक २२/१/२००७

**संदर्भ :** या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-२३(३)/प्र.क्र.५५/३००१ दिनांक १४/११/०६

अभयारण्यामध्ये व अभयारण्या लगत सुमारे ५ कि.मी. परिक्षेत्रामध्ये येणा-या सर्व जनावरांना डिसेंबर ०६ ते जानेवारी ०७, या महिण्यात लसीकरणाची मोहिम हाती घेण्याबाबत दि.३/११/०६ च्या नागपूर येथे झालेल्या सभेत सूचना देण्यात आल्या होत्या. (सहपत्रीत) सदर सभा प्रामुख्याने विदर्भासाठी घेण्यात आली होती.

२.०० दर वर्षी उन्हाळयामध्ये अभयारण्यात पाण्याची समस्या होत असल्याने ब-याच वेळा वन्यप्राणी व इतर जनावरे पाणी पिण्याकरीता पाणवठ्यावर एकत्र येतात. त्यामुळे वन्यप्राण्यांमध्ये संसर्गजन्य रोग पसरण्याची दाट शक्यता असते, करीता जनावरांना लसीकरण करणे अत्यंत आवश्यकता आहे.

३.०० लसीकरण करण्यासंबंधीच्या मार्गदर्शक सूचना, या कार्यालयाचे संदर्भिय पत्रान्वये विदर्भातील अधिका-यांना देण्यात आलेल्या आहे. तथापी संबधित अधिका-यांनी यासाठी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी तसेच स्थानीक पशुसंवर्धन अधिका-यांशी संपर्क साधून अभयारण्यातील व अभयारण्यालगत च्या ५ कि. परीसरात लसीकरण करण्यात यावे. लसीकरण कार्यक्रमाचा सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

सहपत्र : दिनांक ३/११/०६ च्या सभेचा कार्यवृत्तांत

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)
महाराष्ट्र राज्य, नागपूर.

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (सर्व)
(वन्यजीव/प्रादेशिक)

**प्रतिलिपी :** उपवनसंरक्षक (सर्व) यांना माहीतीस व उचित कार्यवाहीस अग्रेषित.

C:\OFFICE\23(3)\23(3)\Genral.doc